**प्रेसनोट दिनांक २५/०३/२०१९**

**मार्केटयार्ड पोलीस स्टेशन**

**मार्केटयार्ड कृषी उत्पन्न बाजार समिती मधील डाळिंब मार्केटयार्डमध्ये शिवजयंती निमित्त मुक बधिर मुला मुलींना कपडे,काटी,चष्मा वाटप कार्यक्रम घेतले बाबत.**

---

दि.२४/०३/२०१९ रोजी मार्केटयार्ड पोलीस स्टेशन हद्दिमधील कृषी उत्पन्न बाजार समिती डाळिंब मार्केटयार्डमध्ये शिवजयंती निमित्त एकुण ३० ते ३५ मुक बधिर मुला-मुलिंना कपडे, काठी, चष्मा वाटप कार्यक्रम घेण्यात आला. मार्केटयार्ड पोलीस स्टेशनकडुन मुक-बधिर मुला मुलींना चष्माचे वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमाच्या वेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक,खटके यांनी सांगितले की, समाजाने मुक बधिर मुला मुलिंना आपली जबाबदारी समजुन त्यांना वेळोवेळी मदत करुन जे अनाथांसाठी आपल्यापरीने जे काही होईल ती मदत करत रहावे असे भाषणात सांगुन उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या वेळी के.डी.चौधरी, संतोष नांगरे, अतुल शिंदे, राजेश मोहोळ, राजेंद्र चोरघे, पोलीस नाईक,व्ही.डी.पडळकर तसेच सर्व स्तरातील मान्यवर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.सदर कार्यक्रमाला एकुण १०० ते १५० जनसमुदाय उपस्थित होता.


साम्राज्य प्रतिष्ठाण
शिवराय मनामनात
शिवजयंती घराघरात
शिवजयंती उत्सव २०१९